RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

वर्ष ८, अंक ९(२)] सोमवार, फेब्रुवारी २१, २०२२/फाल्गुन २, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक २०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त)

आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ फेब्रुवारी २०२२

अधिसूचना

क्रमांक रानिआ/रापनों-२०२२/प्र.क्र. ११/का.११.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए अन्वये तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील तरतुदींन्वये अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झाले आहेत ;

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पावित्र्य राखणे व अशा निवडणुका मुक्त नि:पक्षपातीपणे, प्रभावीपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांची नोंदणी व संबंधित बाबींची तरतूद त्यात करणे गरजेचे आणि आवश्यक असल्याने राज्य निवडणूक आयोगाद्वारे क्रमांक एसईसी/एमसी २००९/सीआर-४९/डी. ११, दिनांक ३१ मार्च २००९, च्या अधिसूचुनेद्वारे, राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ आणि महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ काढण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षाच्या आधारावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घेतल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकांकरिता उक्त आदेश लागू असून केवळ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांना, जेथे पक्षविरहित निवडणुका घेतल्या जातात तेथे हे आदेश लागू नाहीत ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगास उक्त आदेशाप्रमाणे राजकीय पक्षाची नोंदणी करण्यापूर्वी **महाराष्ट्र शासन राजपत्रात** पक्षाचे नाव आणि पत्ता, त्याचे अध्यक्ष व त्यांना जर चिन्ह देण्यात येणार असेल तर ते चिन्ह यांचा अंतर्भाव असलेली सूचना प्रसिद्ध करून सर्वसाधारण जनतेकडून अशा नोंदणीबाबत हरकती मागविणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** उपरोक्त प्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास राज्य निवडणूक आयोग अधिसूचनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे राजकीय पक्षाची नोंदणी करण्याकरिता सक्षम राहील ;

आणि ज्याअर्थी, उक्त आदेशाप्रमाणे कोणतीही हरकत प्राप्त झाली, तर तिचा राज्य निवडणूक आयोग विचार करेल व ती शुल्लक आढळल्यास, फेटाळण्यात येईल व राजकीय पक्षाची नोंदणी करण्यात येईल. त्याचप्रमाणे राज्य निवडणूक आयोगास अशा हरकतीत प्रथमदर्शनी सत्य वाटले, तर ती अर्जदारास कळविण्यात येईल आणि त्यावर त्याचे अभिप्राय मागविण्यात येतील आणि अभिप्राय प्राप्त झाल्यावर, आयोग उपलब्ध अभिलेखाच्या आधारावरील गुणवत्तेवर निर्णय घेईल किंवा, संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकून त्यानंतर निर्णय घेईल व राज्य निवडणूक आयोगाचा असा निर्णय अंतिम राहील ;

आणि ज्याअर्थी, **श्री. सुजीत बंडोपंत शाहीर यांच्या अध्यक्ष,** प्रस्तावित **" जन भारत जागरण पक्ष " मुख्य कार्यालयाचा पत्ता - - महादेव मंदिर जवळ, ता. निलंगा, जि. लातूर, महाराष्ट्र पिन ४१३ ५२१** यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे. **" जन भारत जागरण पक्ष "** अशा नावाने राजकीय पक्ष नोंदणीसाठी अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोल्लिखित पक्ष हा मान्यता प्राप्त राष्ट्रीय किंवा मान्यता प्राप्त राज्यस्तरीय पक्ष नसल्याने अशा पक्षासाठी कोणतेही चिन्ह राखून ठेवणे आवश्यक नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कोणत्याही निडणुकीत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांनी उभ्या केलेल्या उमेदवाराव्यतिरिक्त उभ्या राहिलेल्या कोणत्याही उमेदवारास उपरोल्लिखित आदेशाप्रमाणे आयोगाद्वारे मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या चिन्हांपैकी एका चिन्हाची निवड करता येईल व त्याचे वाटप करता येईल अशी तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, मुक्त चिन्हापैकी एकाच चिन्हाची निवड अनेक उमेदवारांनी केली असेल व अशा अनेक उमेदवारांपैकी केवळ एक उमेदवार नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभा केला असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह त्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल आणि इतर कोणासही नाही, आणि जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा अधिक नोदणीकृत राजकीय पक्षांचे उमेदवार असतील आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरविल आणि ज्या उमेदवारांची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त पक्षास राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करणेपूर्वी सदर नोंदणीबाबत सर्वसाधारण जनतेकडून हरकती मागविणे आवश्यक आहे.

आता त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र सदर **अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत सदर नोंदणीबाबत सर्वसाधारण जनतेकडून कोणतीही हरकत असल्यास, ती परस्पर आयोगाच्या कार्यालयाकडे दाखल करावी** असे जाहीर करीत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

संजय व. सावंत,
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mumbai 400 032, dated 21st February 2022

NOTIFICATION

No.SEC/RPP-2022/CR-11/D-11.—Whereas, the superintendence, direction and control of all elections to the Panchayats and Municipalities in the State are vested in the State Election Commission, Maharashtra by virtue of Article 243-K and 243-ZA of the Constitution of India, and the provisions of the relevant State law as applicable to such Panchayats and Municipalities ;

And Whereas, with a view to provide, in the interest of sanctity of elections to the local bodies, and in the interest of conduct of such elections, in a free, fair, effective and efficient manner, for the registration of political parties and for matters connected therewith; the Registration of political Parties Order, 2009 and Maharashtra Election Symbols (Reservation and Allotment) Order, 2009 has been made by the State Election Commission, Maharashtra *vide* the State Election Commission, Maharashtra, Notification No. SEC/MC-2009/CR-49/D-11, dated 31st March, 2009 ;

And Whereas, the said Order applies to all elections held to local bodies in the State on party basis except elections to Village Panchayats where elections are held on partyless basis ;

And Whereas, before registering a political party under this Order, it is necessary to publish a notice in the *Maharashtra Government Gazette* indicating therein, the name and address of the political party, its President and the symbol proposed to be allotted, if any, and calling for objections, if any, for such registration from the general public ;

And Whereas, as per the said Order, if no objection is received within 30 days from the date of publication of such notification in the *Maharashtra Government Gazette,* it shall be competent for the State Election Commission to register the political party, as proposed in the notification ;

And Whereas, if any objection is so received, the State Election Commission may consider the same and in case it is found to be without substance, it may reject the same and register the political party. If on the other hand, the State Election Commission considers that the objection is *prima facie* genuine, then the same shall be communicated to the applicant and his remarks shall be called for. After receipt of the remarks, the Commission may either decide the matter on merits on the basis of the records available or it may give personal hearing to the parties concerned and take a decision thereafter. The decision of the State Election Commission shall be final ;

And Whereas, **Shri Sujeet Bandopant Shahir,** President of proposed **" Jan Bharat Jagaran Paksh "** having main office address :- **Near Mahadev Mandir, Nilanga, Tal. Nilanga, Dist. Latur, Maharashtra Pin-413 521** has applied to the State Election Commission for registering " **Jan Bharat Jagaran Paksh "** as a political party ;

And Whereas, the said party being neither a recognised National Party nor a State Party, it is not imperative to reserve symbol to it from the list of free symbols ;

And Whereas, as per the aforesaid Order a candidate at an election to local bodies in the State, other than a candidate set-up by a recognised political party shall choose and shall be allotted one of the symbols specified as free symbols by the Commission.

And Whereas, as per the said Order if the same free symbol has been chosen by several candidates at such election, then, if of those several candidates only one is a candidate set-up by registered political party and all the rest are independent candidates, the returning officer shall allot that free symbol to the candidate set-up by the registered political party and to no one else, and if of those several candidates two or more candidates are set-up by different registered political parties and the rest are independent candidates, the returning officer shall decide by lot to which of the two or more candidates set-up by the different registered political parties that free symbol shall be allotted and allot that symbol to the candidate on whom the lot falls and to no one else ;

And Whereas, it is necessary for the State Election Commission to call for objections, if any, from the general public for registration of the said party as a political party.

Now, therefore, the State Election Commission, Maharashtra, hereby **calls for objections, if any, for such registration of the said party from the general public which are to be submitted directly to the Commission within 30 days from the date of publication of this notification in** *Maharashtra Government Gazette.*

By order of the State Election Commissioner,

SANJAY V. SAWANT,
Under Sacretary,
State Election Commission, Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.